# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक २०-११-२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक २० नोव्हेंबर २००७ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखली महानगरपालिकेची सर्वसाधरण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.२० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला नगर सचिव, उपआयुक्त (म.) श्री.घुगे तसेच संबधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२१. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२२. स.स.सौ.सुशिला भगवान रगडे
२३. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.विमल तुकाराम बेंद्रे
२६. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२७. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२८. स.स.सौ.शोभा हरीश्चंद्र मिटकर
२९. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
३०. स.स.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन
३१. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान

३२. स.स.श्री.वसंत पांडुरंग नरवडे पाटील
३३. स.स.श्री.संजु सुग्रीव रिडलॉन
३४. स.स.श्री.खान निसार मोहम्मद खान
३५. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
३६. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३७. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
३८. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
३९. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४२. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४३. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४४. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४५. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
४६. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४७. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४८. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
४९. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५०. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५१. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५२. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५३. स.स.श्री.खुडे विजय किसन
५४. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५५. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५७. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५८. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५९. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६०. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६२. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६३. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६४. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६५. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६६. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६७. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६८. स.स.सौ.अल्पा विकास जैन
६९. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.सबरवाल सुरजितसिंग
०३. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.संतोष खें्डके :कोरम नाही १० मिनिटासाठी सभा तहकूब करावी.

डॉ.भागवत कराड :कोरम पूर्ण होण्यासाठी किती सदस्यांची उपस्थिती पाहिजे व किती सदस्य उपस्थित आहे सचिव यांनी माहिती दयावी सभा तहकूब करू नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :कोरम नाही १० मिनिटासाठी सभा तहकूब करावी.सभागृहात किती सदस्य आहे माहिती दयावी्.

याच वेळी सभागृहात काही स.सदस्य प्रवेश करतात.

डॉ.भागवत कराड :आता सदस्य सभागृहात येत गणपूर्ती होत आहे.

मा. महापौर :आता कोरम पूर्ण झालेले आहे सभा तहकूब करण्याची गरज नाही.दिं.२९.१०.०७ रोजी माझी आपल्या सर्वाच्या सहकार्याने महापौर पदावर निवड झालेली आहे. आपण सर्वांनी मला व उपमहापौर यांना जे सहकार्य केले त्याबध्दल आपल्या सर्वाचे आम्ही आभारी आहोत. आपले सर्वाचे महापालिकेच्या विकास कामात, कामकाजात सहकार्य लाभेल अशी आशा बाळगते.सर्व प्रथम आपण विषय पत्रिकेवर निर्णय घ्यावा.अशी विनंती आहे.

श्री.सलीम खॉन :अगोदर चर्चा व नंतर विषय पत्रिका घ्यावी ही प्रथा १९८८ पासून चालत आलेली आहे ती मोडीत काढू नये. माजी महापौर डॉ.कराड यांनी परंपरा चालू ठेवली होती.

मा.महापौर :जनरल चर्चा घेणारच आहोत वेळ दिला जाईल परंतू अगोदर विषयपत्रिकेवर निर्णय घेवू.

श्री.सतीश कटकटे :१९८८ पासून सभा कामकाज घेण्याची काय परंपरा आहे खूलासा करावा.

श्री.सलीम खॉन :इतर महापालिकेत चर्चा अगोदर होते त्यानंतर विषयपत्रिका घेण्यात येते.कोणत्या नियमानुसार विषयपत्रिका अगोदर घेता येते.

डॉ.भागवत कराड : विषय पत्रिका प्रथम घ्यावे.

मा. महापौर :विषय पत्रिकेला सुरूवात करीत आहेत.चर्चेसाठी पुरेसा वेळ देण्यात येईल.

**विषय क्र.०३/०१ :**

दिनांक २०.०९.२००७ व दि.२९.०९.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**चर्चा :**

श्री.भाऊसाहेब ताठे :दिं.२०-९-२००७ च्या इतिवृत्तातील प्रश्नोत्तरामध्ये पान क्र.९ वर १२ वर्षानंतर कर्मचारी /अधिकारी यांना देय असलेली समयश्रेणी देण्या बाबत यादी दिलेली आहे यात सौ. ज्ञानदा कुलकर्णी यांचे नाव आलेले नाही. या नावाचा तसेच इतर आणखी ज्या कर्मचा-याची नावे राहिलेली असेल ती यादीत समाविष्ट करण्यात यावी.

श्री.संजय जोशी :८१ कर्मचा-याची यादी दिली एवढेच कर्मचारी समयश्रेणीसाठी देय आहेत का ?

श्री.प्रशांत देसरडा :यातील व आणख्री काही कर्मचा-याच्या खातेनिहाय चौकशा चालू आहे चौकशी तात्काळ का होत नाही.

सहा.आयुक्त(अस्था-१) :१२ वर्षानंतरची समयश्रेणी बाबत हे ९ व्या महिण्यात नावाची यादी काढलेली होती आता ११ वा महिना चालू आहे आणखी नावाचा समावेश होवू शकेल. सौ.ज्ञानदा कुलकर्णीचे नाव नजरचुकीने राहिलेले आहे ज्यांची नावे घ्यायची राहिली असतील ती समावेश करण्यात येतील. ८१ पेक्षा जास्त नांवे आहेत जे चूकून राहीले त्याबद्दल दिलगीरी व्यक्त करण्यांत येते.

श्री.अ.रशिद खान :आणखी किती लोकाची नावे या यादीत आलेली नाही जी राहिलेली असेल ती समाविष्ट करता येतील का?

सहा.आयुक्त(आस्था-१) :आणख्ीा बरेच कर्मचा-याची नावे राहिलेली आहे दिलगीरी व्यक्त केली असून याची माहिती घेवून पूढील बैठकीत देण्यात येईल.जी ८१ नावे आहेत यास आताच्या ठरावानुसार कायम करता येतील.

श्री.संजय जोशी :प्रश्नोत्तरात हा प्रश्न विचारलेला आहे जे प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे त्यात नावे राहून गेली आहे यात दुरूस्ती करायची आहे ज्या ज्या कर्मचा-यांना १२ वर्ष पूर्ण झाली त्या सर्वांच्या नावाचा यात समावेश करावा कुणावरही अन्याय होणार नाही याची दखल घ्यावी.

मा. महापौर : ज्या ज्या कर्मचा-यांना १२ वर्ष पूर्ण झालेली असतील त्या त्या सर्व कर्मचा-याची नावे या यादीत समाविष्ट करावी.कर्मचा-यांच्या खातेनिहाय चौकशी बध्दल खुलासा करावा.

सहा.आयुक्त -१ :ॲन्टी करप्शन ब्युरो प्रकरणात ११ लोक आहेत त्या विभागामार्फत त्याची चौकशी चालू असून त्या विभागाचा खुलासा आल्यानंतर प्रशासन कार्यवाही करण्याचा निर्णय घेणार आहे.खातेनिहाय चौकशी चालू असलेल्या १० कर्मचा-याची नावे यात आहे.त्याची खातेनिहाय चौकशीसाठी चौकशी अधिकारी व सादर कर्ता अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. या लोकांच्या खातेनिहाय चौकशी सहा महिण्याच्या आत पूर्ण कराव्यात म्हणून संबधीत चौकशी अधिकारी यांना तसे पत्रही या विभागाकडून गेलेले आहे. चौकशी आणखी प्रलबींत असून पून्हा या अधिका-यांना स्मरण पत्र देण्यात येईल. व निर्धारीत वेळेस चौक्शी पूर्ण करून निर्णय घेण्यात येईल.

श्री.देसरडा प्रशांत :कर्मचा-यांच्या खातेनिहाय चौकशी करण्यास उशीर लागत असेल तर न केलेलीच बरी वेळीच कार्यवाही होत नसल्याने कर्मचा-यावर प्रशासनाचा वचक राहत नाही जे चांगले काम करतात त्यांचावर एक प्रकारचा अन्यायच होतो असे म्हणावे.सन २००३ पासून काही कर्मचा-याच्या बाबतीत चौकशी चालू आहे.विलंब का होत आहे जे चौकशी समिती असेल ते चौकशी अहवाल ताबडतोब का देत नाही याची चौकशी करण्याची वेळ येवू नये. ज्या चौकशा अपुर्ण आहेत त्या पूर्ण करून पूढील बैठकीत अहवाल दयावा.

श्री.सतीश कटकटे दिं.२०-९-२००७ च्या इतिवृत्तातील पान क्र .९ वर मी एक प्रश्न दिलेला होता उत्तर मला मिळाले नाही.म्हणून चर्चा झालेली होती ज्यांनी उत्तर दिले नाही अशा कर्मच-याची वेतनवाढ कमी करावी व ज्यांचेकडे नगरसेवकांच्या पत्रानुसार उत्तर प्रलबीत असेल अशा संबधीत अधिका-यांची वेतनवाढ थांबवावी असे आदेशीत केले होते.या बाबतीत काय कार्यवाही झालेली आहे.महापौराच्या आदेशाचे पालन होत नसेल तर सभा घेवून उपयोग नाही.

श्री.देसरडा प्रशांत : नारायण तेली नावाचे एक कर्मचारी १९९० पासून निलंबीत आहे. तेंव्हापासून त्यास घरबसल्या ७५ टक्के पगार दिला जातो. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची रक्कमही वसूल झालीकी नाही माहित नाही. एकीकडे विकास कामासाठी निधी नाही असे म्हटले जाते व एकीकडे कर्मचा-यांना घरपोच १५ ते २० वर्ष काम न करता पगार दिला जातो हे योग्य नाही.

मा.महापौर : संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा.आयुक्त -१ :नारायन हिरामन तेली जुने वार्ड कार्यालय एन ७ यांनी ७.९१ लक्षचा अपहार केलेला होता या संबधी सिडको पोलीसस्टेशन मध्ये फिर्याद दाखल

करण्यात आलेली होती.प्रकरण न्यायप्रविष्ठ होते आताच त्या बाबतीत रूलीग आलेले आहे विधी सल्लागार या बाबतीत खुलासा करतील. श्री.नारायण तेली याची चौकशी करण्यासाठी श्री.संजय पवार यांचेकडे दिलेली आहे ती पुर्ण झाल्यानंतर कार्यवाही करता येईल.

श्री.देसरडा प्रशांत :जर या प्रकरणात मा. न्यायालयाने निर्णय दिलेला असेल तर चौकशी कशाची चालू आहे न्यायालयाचे आदेश झाल्यानंतरही चौकशी करता येते का?

श्री.संजय केनेकर :संबधीत अधिकारी चुकीचा खुलासा करीत आहे त्यांना काहीही माहिती नाही. योग्य तो खुलासा व्हावा.

सहा.आयुक्त-१ :पुन्हा ही चौकशी उपआयुक्त श्री. सोमनाथ शेटे तसेच डी डी सुर्यवंशी यांचेकडे दिलेली आहे.

श्री.संजय जोश्ी :संबधीत कर्मचा-यांच्या बाजूने मा. न्यायालयाने निकाल दिलेला आहे असे असतांना पुन्हा कायदयाने चौकशी करता येते का?

श्री.संतोष खेंडके :चौकशा करण्यामध्ये वेळ जातो श्री.तेली नावाचे कर्मचारी यांना गेल्या १७ वर्षापासून घरी राहून त्यांना पगार दिला जातो.

सहा.आयुक्त-१ :श्री.तेली यांनी अपहार केलेला होता त्याचे विरूध्द पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केलेला होता.महापालिकेने दाखल केलेली नाही पोलीस स्टेशन गुन्हा दाखल केल्यानंतर मा. न्यायालयात हे प्रकरण गेले.व मा.न्यायालयाने त्यास निर्दोष मुक्त केलेले आहे.महापालिकेचे म्हणणे होते त्यांनी रक्क्मेचा अपहार केला आहे ती वसूल करायची किंवा कसे या बाबत चौकशी नियुक्त केली आहे.

श्री.संजय जोशी :पोलीस स्टेशनला अपहार केल्याचा गुन्हा दाखल केला असेल प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले व न्यायालयाने त्यांनी अपहार केला नाही म्हणून निर्दोष सोडले पुन्हा डीई कशासाठी व कोणत्या नियमाने करीत आहेत.

श्री.संजय केनेकर : आपला व मा.न्यायालयाचा कायदा वेगळा आहे का?

श्री.भगवान घडमोडे :यात प्रशासनाचा बेजबाबदारपणा आहे. पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला कर्मचा-यास क्लीनचीट दिली व रक्कम वसुलीच्या संदर्भात कार्यवाही करावी लागणार आहे असे सभागृहाला दाखवायचे मा.न्यायालयाने त्या कर्मचा-यांच्या बाजुने निकाल लागलेला आहे त्यास कामावर घ्यावे लागणार आहे हे प्रशासन शेवटी सांगणार आहे १७ वर्ष घरी बसून ७५ टक्के पगार दिला पुन्हा २५ टक्के प्रमाणे दयावा लागणार आहे सर्व प्रकरण घडून काहीही निष्पन्न होणार नाही.

श्री.संजय जोशी :मा.न्यायालयाने त्या कर्मचा-यांच्या बाजूने निकाल दिलेला असतांना चौकशी कशासाठी व कोणत्या नियमाने करीत आहे. जेंव्हा प्रकरण चालू होते त्याच वेळी महापालिकेचे वकील हजर असते व सर्व कागदपत्र न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले असते तर हे कर्मचारी दोषी ठरविले गेले असते प्रशासन तेथ्े कमी पडले. मा.न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर चौकशी करण्याचे अधिकार आहे असे मला लेखी प्रशासनाने दयावे.

सहा.आयुक्त-१ : एम.सी.एस.आर. जी तरतूद आहे त्यास अधिन राहून चौकशी करणार आहोत.

श्री.भगवान घडमोडे :चौकशी केल्यानंतर संबधीत कर्मचारी दोषी आढळले तर काय कार्यवाही करणार आहे.

सहा.आयुक्त-१ :पुढील सभेत या संदर्भात पुर्ण चौकशी करून उत्तर दिले जाईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :अशाच प्रकरणात जे जे कर्मचारी असतील त्यांना सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असेत त्यांना कामावर घ्यावे ते ज्या विभागात होते तेथे् त्यांना देवू नये. काम न करतां पगार दिला जातो कामावर असतांना सुध्दा चौकशी करता येते.काम करून घ्यावे काम न करता पगार देणे योग्य नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयाने एकदा निर्णय दिल्यानंतर त्या प्रकरणात चौकशी करता येते का? लहानसा विषय आहे पुढील बैठकीपर्यत वाट न पाहता विधी सल्लागार येथे् आहे चौकशी करता येते का खुलासा घ्यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : सर्वांना सारखा न्याय मिळावा. एका पूरता मर्यादित नसावा.

श्री.संतोष खें्डके :मा.न्यायालयाच्या निर्णय आपल्याला बंधनकारक राहील.चौकशी करणे योग्य नाही. सदर कर्मचारी यांना काम न करता महापालिकेने १७ वर्ष पगार दिला त्यातून बरीाचशी रक्कम वसूल झाली असती. तुझी चौकशी मी करतो, माझी चौकशी तू तेरी भी चूप मेरी भी चूप. मा.न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून रूजू करून घ्यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आरोग्य विभागात लायसन्स देण्याच्या कामात दोन कर्मचारी यांचेकडून ४,५००रू.भ्रष्टाचार झालेला होता त्यांचेवर ५.३० वा. निलंबणाची कार्यवाही व ६.३० वा.लगेच पोलीसात गुन्हा दाखल केला गुणवानी जागेच्या प्रकरणात महापालिकेला १.१२ कोटीचा फटका बसला जे कुणी संबधीत अधिकारी कर्मचारी होते त्यांचेवर वरील प्रमाणेच का कार्यवाही केली नाही.

श्री.विनायक पांडे :श्री.गायकवाड नावाचे वाहन चालक यांनी महापालिकेच्या शाळेतून विज व नळ जोडणी अनधिकृत पणे करून घेतली म्हणून त्यांना निलंबीत केले त्याची चौकशी ६ महिण्यापासून चालू आहे चौकशीसाठी किती कार्यकाळ दिलेला आहे श्रीरामटेके व श्री. गिरी याची पाच पाच प्रकरणात चौकशी चालू असतांना त्यांचे नाव या यादीत नाही.

श्री.संजय केनेकर :ज्या अधिकारी /कर्मचारी यांचेवर चौकशी चालू आहे त्या सर्वांची नावे यात आलेली आहे का ?

डॉ.भागवत कराड :ज्या ज्या अधिकारी कर्मचारी यांचे चौकशा चालू आहे त्या एक महिण्याच्या आत पूर्ण करण्याचे आदेशीत करावे व कुणावर कोणती कार्यवाही करायची आहे यासह पुढील बेठकीत तसा अहवाल प्रशासनाने सादर करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :माझे प्रश्नाचा खुलासा करावा. ४५०० हजारासाठी निलंबित ६.३० वा. गुन्हा दाखल १.२० कोटीचा विषय पाठीमागे टाकतात.

मा.महापौर :एक विषय संपल्यानंतर दुस-या विषयावर आपल्याला चर्चा करता येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे :प्रश्न मांडतांना सभागृहाला काही नियम असावेत.प्रत्येक वेळी अधिकारी पुढील बेठकीत खुलासा केला जाईल असे सांगतात परंतू यामुळे या सभागृहाचे वर्चस्व राहत नाही. जे वेळेवर माहिति देत नसतील अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही होणे आवशयक आहे.

मा. महापौर :आताच जी चर्चा झाली त्यानुसार जो प्रशासनाने खुलासा केला त्या उत्त्तराने सभागृहाचे समाधान झालेले नाही. जे प्रश्न स.सदस्य विचारतात त्याची उत्तरे व्यवस्थीत व वेळेवर मिळतील याची काळजी प्रशासनातील अधिकारी यांनी घ्यावी.

श्री.संजय केनेकर :प्रश्नोत्त्तरात जी माहिती दिली ती बरोबर आहे का ?

श्री.संजय जोशी :मा.न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर पुन्हा त्याच प्रकरणात चौकशी करण्याचा कोणत्या नियमाने अधिकार आहे माहिती दयावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ज्यांचेवर चौकशी चालू आहे त्यांची नावे यात का आलेली नाही.

सहा.आयुक्त-१ :यात ॲन्टी करप्शन ब्युरो ११ प्रकरण आहेत ही नावे ९ व्या महिण्यापर्यंतची आहे जी राहिलेली असेल ती पुढील सभेत देण्यात येईल. ज्या चौकशा चालू आहे त्यातील श्री.वाघमारेचे प्रकरण निकाली काढून त्यांना बडतर्फ केलेले आहे.श्री.गिरी व श्री.रामटेके यांचे संदर्भात मागिल बैठकीतच खुलासा केले चौकशी अहवाला आला होता त्यानुसार शिक्षा केलेली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जी यादी दिली ती अपुर्ण आहे ठराविक अधिका-यांना वाचविण्याचा हा प्रयत्न आहे.चौकशी ज्यांची चालू आहे त्या सर्वाचे नाव या यादीमध्ये येणे आवश्यक होते. ती नावे एक महिण्यात समाविष्ठ करून पुढील सभेत हा विषय पुन्हा चर्चेला घ्यावा.

श्री.संजय केनेकर :इतर काही प्रकरणात तडजोड झाली असतांना त्यांची चौकशी चालू आहे म्हणून या यादीत नावे आलेली आहे ती कशी आली.

श्री.रेणुकादास वैद्य :९९ टक्के अधिका-यांच्या चौकशा चालू आहे एक दुस-याची चौकशी अधिका-याकडे दिल्यामूळे त्यांची नावे यात आली नसावी ती ॲड करावी एक महिण्यात सर्वाचा एकत्रित अहवाल मागवावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :अनेक अधिका-यांच्या बाबतीत चौकशा चालू आहे चौकशी समिती मध्ये काही पदाधिकारी नगरसेवकांचा जॉईन्टली समावेश करावा जेणे करून होणारी चौकशी निपक्षपातीपणे होईल.

डॉ.भागवत कराड :१ ते १६ जे कर्मचारी दिले त्याची एक महिण्याच्या आत चौकशी पूर्ण करावी व जे राहिले असतील त्यांचा यात समावेश करून हा विषय संपवावा.

मा.महापौर :प्रशासनाने दिलेले उत्तर समाधानकारक दिले नाही याची दखल घ्यावी. १ ते १६ अधिका-यांची चौकशी चालू असल्याचे यात दिले या व्यतिरिक्त जे कुणी अधिकारी कर्मचारी राहिले असतील त्या सर्वाचा यात समावेश करून एक महिण्यात चौकशी करण्यात यावी. पुढील बैठकीत अहवाल सादर करावा. सर्वसाधारण सभेने दिलेल्या सूचनेचे पालन करावे. याबाबत दक्षता घेण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :स.सदस्य श्री.कोकाटे काशिनाथ यांनी जी सुचना केली, त्याची दखल आपण घ्यावी. अधिकारी एकमेकांच्या चौकशा करीत आहे यात काही निष्पन्न होणार नाही.

मा. महापौर :आपल्या सुचनाची दखल घेतलेली आहे प्रशासनाला अहवाल देण्याचे आदेशीत केलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :इतिवृत्तातील पान क्र.१२ वर प्रश्न क्र.९२ मध्ये पानदरीबा लोटाकांरजा हा रस्ता ४० फुटाचा असावा असे मा.उच्च न्यायालयाने त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केलेले आहे. त्यानुसार महापालिका प्रशासन कामास लागले. ५० टक्के काम पूर्ण झालेले आहे.तत्कालीन मा. महापौर यांनी त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली व काम करण्यास गती दिली.परंतू या रस्त्याचे अर्धे काम झालेले असतांना पूढील काम का बंद करण्यात आलेले आहे.

विधी सल्लागार :मा.न्यायालयाने दिलेला निर्णय या उत्तरात दिलेलाहोता काम का चालू झाले नाही नगररचना विभगाने माहिती दयावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सहा. संचालक नगररचना अधिकारी यांचेकडून माहिती घ्यावी.

उपअभियंता(न.र.) :या बाबत सध्या माझेकडे माहिती नाही पुढील बैठकीत माहिती दिली जाईल.हा विषय प्रशासकीय विभगाच्या संबधीत आहे.

श्री.प्रशांत देसरडा :पोटतिडकीने स.सदस्य प्रश्न विचारतात अधिकारी उत्तर माहित नाही असे सांगतात हे योग्य नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे :प्रश्न केल्यानंतर उत्तर देण्याला नियम असावयास पाहिजे अधिकारी थतूर मातूर उत्तर देतात अशा अधिका-यांवर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :स. सदस्याचे प्रश्नाकडे लक्ष दयायचे नसेल तर या सभागृहात राहण्यात रहस्य नाही आम्ही बाहेर जात आहोत.

याचवेळी स.विरोधी पक्ष नेते यांचे सहकाही सदस्य सभागृहाच्या बाहेर जातात.

श्री.देसरडा प्रशांत :राजकारण कुणीही करू नये जनतेने विकास कामासाठी पाठविले आहे.

उपअभियंता(न.र.) :हा मुद्या प्रशासकीय विभागा संबधीत आहे.

प्र.प्रशासकीय अधिकारी : ४० फुट रूंद विकास योजना रस्त्याचे नगररचना विभगाने मार्किंग करून दिल्यावर काढून देण्यांत येईल.

उपअभियंता(न.र.) :मार्किंग केलेले आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे :मा.न्यायालयाचे आदेश असतांना पानदरीबा रस्ता रूंद का होत नाही १०० मी.रस्ता असेल ७० मीटर मधील घरे पाडली जातात ३० मी. मधील का काढली जात नाही.याचा अर्थ वरीष्ठ कोर्टात त्या लोकांना जाण्याची संधी अधिकारी देत आहे असा अर्थ निघतो. सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे. मार्कआउट केले असेल तर काम सुरू करावे.

श्री.वसंत नरवडे :विषयपत्रिका संबधीत अधिका-यांना दिली पाहिजे त्यावर त्यांनी अभ्यास करून उत्तरे देण्यासाठी सक्षम अधिकारी व जे प्रश्न विचारले जातात सभा संपल्यानंतर त्या बाबतीत प्रशासनाने दखल घेतली पाहिजे परंतू सभेच्या दिवशी रजा देवू नये, दिली तर त्या त्या अधिका-यानी त्यांचे विभगाची माहिती सभागृहासमोर सादर होईल याची दखल घेतली पाहिजे.हा पायंडा आपण पाडावा अशी विनंती आहे पैठणगेट ते बाराभाई ताजीया ते औरंगपूरा हा रस्ता करण्याचा आपण निर्णय घेतलेला असतांनाही अदयाप काम सुरू झालेले नाही. उत्तर अप्राप्त म्हणून आलेले आहे.

प्र.प्रशासकीय अधि. :हा विषय मी प्रशासकीय अधिकारी पदभार स्विकारण्या पूर्वीचा आहे. या बाबत मला कोणतीही माहिती नाही नगररचना विभगाने मार्कीग करून दयावी कार्यवाही होईल.

श्री.भगवान घडमोडे :माझे कार्यकाळातील हा विषय नाही असे बोलून अधिका-यांनी जबाबदारी झटकून चालणार नाही. कुणाच्या नावानुसार प्रश्न विचारत नाही जो त्या पदावर आहे त्या त्यांना विचारतो आहे. या रस्त्यातील मागचे व पुढचे अतिक्रमण काढले मध्यभागी असलेलेच दुकानचे अतिक्रमण का काढलेले नाही.हे तपासणीसाठी वेळ लागणार नाही मा. न्यायालयाच्या आदेशानुसार जे मार्कीग झालेले असेल त्यानुसार लगेच कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.संतोष खे्डके : दोन्ही बाजूने रस्ता रूदींकरण झालेले आहे. मध्येच का राहिलेला आहे.

मा. महापौर :सर्व विभागाचे अधिकारी यांनी समन्वय करून काम केले पाहिजे एकमेकांचे नाव दाखविणे योग्य नाही. तो समन्वय या विभगानी करावा व यापूढे काम करावे. या रस्त्याच्या संदर्भात मंजूर विकास योजना आणि भुसंपादन निवाडया प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी त्याचा अहवाल महापौर म्हणून माझ्याकडे सादर करावा.

श्री.संजय जोशी : ही विषयपत्रिका स्कॅन करून वेब साईडवर येणार आहे जे सदस्य सभागृहात बोलतात तेच इतिवृत्तात नोंद व्हायला पाहिजे.दिं.२९-९-२००७ चे इतिवृत्तात पान क्र. ७ वर ॲफिडेवीट केलेले मुळ कागदपत्रमालकाने सेक्रेटरी तसेच मा. आयुक्त यांना ॲफिडेवीट दिलेले आहे सेक्रेटरी म्हणजे मी

प्रिन्सीपल सेक्रेटरी म्हटलेलो होतो. याकडे प्रशासनाने लक्ष दयावे. दुसरी या इतिवृत्तातील पान क्र.१८ वर जगातील कोणतीही बँक नुसती गाडी तारण ठेवून कर्ज देत नाही त्यासाठी दोन गॅरन्टर लागतात त्यांचे पेमेन्ट वगैरे या शब्दात काना मात्रा विलांटी अशी दुरूस्ती करावी.त्याच पानावर बँकेला महानगरपालिकेने गॅरन्टर राहू नये व १ ऑफ द पार्ट म्हणून सुध्दा गॅरन्टर राहू नसे अशी दुरूस्ती करावी. असे मी म्हटले होते

मा.महापौर : ज्या दुरूस्त्या सुचविल्या त्या दुरूस्त्या कराव्यात.

श्री.वसंत नरवडे :पैठणगेट ते गुलमंडी बाराभाई ताजीया चौक या रस्त्याचे रूंदीकरण अदयाप का सुरू झालेले नाही. या बाबत अप्राप्त उत्तर म्हणून आलेले आहे कोण खुलासा करणार आहे.

उपअभियंता (न.र.) :पुढील बैठकीत याबाबत माहिती दिली जाईल.

मा.महापौर :या बाबत माहिती पुढील बैठकीत सविस्तर ठेवावी विषय क्र १ दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

श्री.प्रशांत देसरडा :शहरात जे हायमास्ट दिवे लावण्यात आले प्रश्न देवून माहिती विचारलेली होती उत्तर मिळाले नाही.या बाबत महापालिकेची भुमिका काय?

कार्य.अभियंता(विद्यु) : याबाबत स.सदस्य यांना माहिती आता देण्यांत येणार आहे.

श्री.देसरडा प्रशांत :मागिल तीन महिन्यात जसे थ्रीसेट लावतो त्याप्रमाणे हायमास्ट दिवे लावले आहे. हायमास्ट लावल्यानंतर किती स्क्वेअर फुट प्रकाश पडतो. काही हायमास्ट प्रकाश लोकांच्या घरासाठी पडतो काही हायमास्ट जेथे् आहे ती जागा महापालिकेची नाही. त्यांचे बाजूला इमारत, मस्जीद आहे. गंभीर विषय आहे की वीज कपात स.सदस्या जेंव्हा हायमास्ट लावण्याची मागणी करता त्यावेळी पत्र दाखविले जाते आज सरास हायमास्ट लावले जाते. चुकीच्या ठिकाणी लावले निविदा काढली नाही. डायरेक्ट लावले. आता २०% कमी दराने निविदा येतात. हायमास्ट लावले ती जागा सुटेबल होती की नाही याची सखोल आपण चौकशीचे आदेश दयावे व पुढील बैठकीत अहवाल मागविण्यात यावा.

कार्य.अभियंता(विद्यु.) :हायमास्ट बध्दल माहिती दिलेली आहे एक दोन ठिक्‌ाणचे वगळता बाकीचा रस्ता आहे. बाजुची जागा महापालिकेचे भुसंपादीत केलेली आहेती जागा राहिलेली आहे त्या जागेत लावलेले आहे.`अंडर ॲक्व्हीजेशन मध्ये ती जागा आहेअर्थसकल्पांत जे २० ते २२ हायमास्ट लावण्यासाठी तरतूद केलेली आहे त्यानुसार कार्यवाही केली.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : हायमास्टची जागा नगरसेवक दाखवतात. ते लावत नाहीत.

श्री.देसरडा प्रशांत :एक हायमास्ट बसविल्यानंतर त्याचे सभोवतली किती स्क्वेअर फुट प्रकाश पडतो.

कार्य.अभियंता(विद्यू.) :सर्वसाधारण सभेने धोरण ठरवल त्यानूसार कार्यवाही होते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :वार्ड बदलला म्हणून रेट बदलतात असे नाही. एक वर्षात एक हायमास्ट बसविण्यास जो खर्च येतो तोच इतर ठिकाणी आला पाहिजे असे माझे मत आहे. स्थायी समितीने दर ठरविले तर प्रत्येकवेळी निविदा काढण्याची गरज आहे का?

श्री.त्र्यंबक तुपे :जेथे् जेथे हायमास्ट बसवायचे आहे त्यांचे एकत्रिक टेंडर करावे.

मा.महापौर :जे प्रश्न स.सदस्य श्री. देसरडा प्रशांत यांनी विचारलेला आहे त्या संबधीचा लेखी अहवाल त्यांना व मला दयावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : राहीलेले काम थांबणार नाही, याची काळजी घ्यावी.

श्रीमती कला बोरामणीकर:तीन वर्षापासून तापडीया रंग मंदीर चौकात हायमास्ट बसविण्याची मागणी करते कार्यवाही होत नाही.

**ठराव :**

दिनांक २०.०९.२००७ व दि.२९.०९.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.०४/०२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७२ अंतर्गत मुख्य रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या जिल्हा दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचा अंदाजीत खर्च रू.४०,९९,८००/- एवढा आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात १५ व १८ मी. रूंद रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करण्याचा समावेश आहे. या अंतर्गत १५८० मी. लांब व सरासरी १० मी. रूंद रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करण्याचे नियोजन आहे. यापूर्वी या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सिडको विभागामार्फत करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामात रस्त्याचे मजबुतीकरण करण्यासाठी तरतुद उपलब्ध करण्यात आलेली आहे.

या कामाच्या रू.४०,९९,८००/- खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**चर्चा :**

डॉ.भागवत कराड :ज्या वार्ड मध्ये डांबरीकरणाचे काम होत आहे ते वेगळया शिर्षक मध्ये घ्यावे. कारण ४० लक्षमध्ये दुसरे विकासची कुठलीही कामे होणार नाही. डांबरीकरणाचे काम असल्याने ते ५० लक्षचे असावे.

मा.महापौर : ज्या ज्या ठिकाणी मोठे रस्ते किंवा डीपी रोड आहेत.त्या ठिकाणी काम करतांना ते मोठे काम आहे म्हणून ५० लक्षमधी काम आहे असे गृहीत धरू नये.

श्री.काशिनाथ कोकाटे :५० लक्षला अधिकृत मंजूरी देत आहेत का ?कोणत्या अधारे आकडा आलेला आहे.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रभाग क्र.७२ अंतर्गत मुख्य रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या जिल्हा दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचा अंदाजीत खर्च रू.४०,९९,८००/- एवढा आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात १५ व १८ मी. रूंद रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करण्याचा समावेश आहे. या अंतर्गत १५८० मी. लांब व सरासरी १० मी. रूंद रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करण्याचे नियोजन आहे. यापूर्वी या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सिडको विभागामार्फत करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामात रस्त्याचे मजबुतीकरण करण्यासाठी तरतुद उपलब्ध करण्यात आलेली आहे.

तरी या कामाच्या रू.४०,९९,८००/- खर्चाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : विषय क्र. ३ ते ५ मंजूर

**विषय क्र.०५/०३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीनच्या पुरवठयासाठी अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. वार्षीक पुरवठयाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २७,०४,०००/- इतकी आहे.

आर्थिक वर्ष २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदी करीता तरतुद करण्यात आली आहे. करीता वर्ष २००७-०८ मधील वार्षीक क्लोरीनच्या पुरवठयासाठी रक्कम रूपये २७,०४,०००/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीनच्या वार्षीक पुरवठयाच्या रक्कम रूपये २७,०४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.०६/०४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४४, सेंट्रल नाका कब्रस्तान ते रहेमानिया कॉलनी पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे, या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बा. खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रक र.रू.२४,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००७-०८ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र.डब्ल्यु-२३२ वरील शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अंतर्गत अ.क्र.३ प्रमाणे उपलब्ध तरतुद र.रू.२२ लक्ष आणि पान क्र.डब्ल्यु-३८ वरील अ.क्र.१८ प्रमाणे उपलब्ध र.रू.४२.७५ लक्ष मधून २ लक्ष असे एकुण २४ लक्ष भागविणेचे प्रस्तावित आहे. रक्कम रू.२४,००,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४४, सेंट्रल नाका कब्रस्तान ते रहेमानिया कॉलनी पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणेच्या र.रू.२४,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे विषय

**विषय क्र.०७/०५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८२ येथे मातोश्री नगर अंतर्गत प्राथमिक शाळा बांधणेसाठी व मातोश्री नगर येथे खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणेसाठी सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.२२८ वर प्रत्येकी १०.०० लाखाची तरतुद करण्यात आली आहे.

तथापी सदरील २०.०० लक्ष डि.पी.रोड मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन रोड, पारिजातनगर, राजमाता जिजाऊ हौ.सोसायटी पर्यंत ड्रेनेज लाईनसाठी वळती करण्या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे

अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल, श्री.राजेश (पप्पू) व्यास, श्री.भागवत कराड, श्री.त्र्यंबक तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८२ येथे मातोश्री नगर अंतर्गत प्राथमिक शाळा बांधणेसाठी व मातोश्री नगर येथे खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणेसाठी सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.२२८ वर प्रत्येकी असलेली र.रू.१०.०० लाखाची तरतुद **याऐवजी** सदरील र.रू.२०.०० लक्ष डि.पी.रोड मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन रोड, पारिजातनगर, राजमाता जिजाऊ हौ.सोसायटी पर्यंत ड्रेनेज लाईनसाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र.०८/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग इ अंतर्गत विविध विकास कामे करणे अत्यंत आवश्यक असुन खालील अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग इ अंतर्गत विविध ठिकाणी नविन पोल लावणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु १४५ अ.क्र.२ तरतुद रक्कम २० लक्ष | प्रभाग इ अंतर्गत एन-२ सिडको येथे विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोलचे भुमीगत केबल बदलणे. |

सुचक : श्री. दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**चर्चा :**

श्रीमती जयश्री किवळेकर : वार्ड कार्यालय ई अंतर्गत भूमिगत केबलसाठी वळती करण्यास मान्यता मिळावी व ज्या ज्या वार्डात अंतर्गत भूमिगत केबलची कामे असतील ती करण्याचा विचार करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ड्रम प्रोजेक्ट होणारच आहे हा विषय घेवू नये.

श्रीमती जयश्री किवळेकर : विविध प्रभागात याचा समावेश करावा.

श्री.भगवान घडमोडे :ड्रम प्रोजेक्ट होत असेल तर डबल खर्च करण्याची गरज नाही पोलचा सर्वे करून घ्यावा जेथे् पोल नाही तेथे् केंबलसाठी सर्वे करावा. डबल इस्टीमेट होवू नये.

श्री.संतोष खेंडके :पोलसाठी बजेट आहे माझ्या वार्डात पोलची आवश्यकता आहे पोलचेच काम व्हावे.

मा.महापौर :वार्डाचा सर्वे करावा या पध्दती ज्या वार्डात असे काम करण्याची गरज आहे तेथे् करण्याची कार्यवाही करावी विषयास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग इ अंतर्गत असलेल्या अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्षक बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग इ अंतर्गत विविध ठिकाणी नविन पोल लावणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु १४५ अ.क्र.२ तरतुद रक्कम २० लक्ष | प्रभाग इ अंतर्गत एन-२ सिडको येथे विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोलचे भुमीगत केबल बदलणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.०९/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.११ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W ६०/३ | वार्ड क्र.११ व्हीआयपी रोडवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा वाहतुक बेटाची देखभाल व फुटपाथ दुरूस्ती करणे- २.२५ लक्ष. | महापौर परिषदेनिमित्त प्रशासकीय इमारत येथे रंगरंगोटी करणे, विद्युतीकरण करणे, ॲल्युमिनीयम डोअर बसविणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. - २.०० लक्ष. |

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना अनुमोदक : श्रीमती शमशाद बेगम

डॉ. भागवत कराड :विषय क्र. २ प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक उपस्थित नाही स्थगिती दयावी.

मा. महापौर : सुचक अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्यामूळे स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक,अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्यामूळे, स्थगिती देण्यांत आली.

**विषय क्र.१०/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भिमनगर भावसिंगपुरा येथील पुल ते महानगरपालिका शाळा या मार्गास शहीद विलास शिंदे मार्ग असे नाव देण्यात यावे.

करीता ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे अनुमोदक : श्री.सलिम खान यासीन खान

डॉ. भागवत कराड :सुचक अनुमोदक उपस्थित नाही स्थगिती दयावी.

मा. महापौर :विषय क्र.३ ते ५ चे सुचक अनुमोदक उपस्थित नसल्याने स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक,अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्यामूळे, स्थगिती देण्यांत आली.

**विषय क्र.११/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्प पुस्तिकात नमुद (०१) प्रभाग क्र.३१ लोटाकारंजा हर्षनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणे एकुण रू.४ लाख पान क्र.W-६४ वर, (०२) लोटा कारंजा मुलमची बाजार येथे १०० मि.मि. व्यासाची डी.आय.के-९ जलवाहिनी टाकणे रक्कम २.२० पान क्र.-W-५१ वर

**उपरोक्त दोन्ही कामाऐवजी**

प्रभाग क्र.३१ अंतर्गत ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे, गटार दुरूस्ती, पेव्हर ब्लॉक बसविणे/ दुरूस्ती करणे, फर्शी बसविणे दुरूस्ती करणे, कॉंक्रेटींग करणे, खडी रस्ते, माती उचलणे खडी/ मुरूम टाकणे इत्यादी आवश्यकतानुसार फुटकळ कामे एकुण रक्कम : ६.२० लाख वार्ड कार्यालय अ कडे वळती.

सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक,अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्यामूळे, स्थगिती देण्यांत आली.

**विषय क्र.१२/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सदर काम वार्ड अ अंतर्गत असून (पान क्र.६३ अ.क्र.६ रू.१००) उपरोक्त काम रद्द करून लोटा कारंजा भागात पाणीपुरवठा जलवाहिनीची लांबी वाढवून घेण्यासाठी सदर बजेट वळती करण्यात यावे. तसेच सदर काम हे वार्ड अ मधून असून ती रक्कम पाणीपुरवठा विभागाकडे वळती करण्यात यावे. म्हणजे सदर काम पाणीपुरवठा विभाग लवकर करील.

सुचक :श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक,अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्यामूळे, स्थगिती देण्यांत आली.

**विषय क्र.१३/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा दिनांक १८.०७.२००७ प्रस्ताव क्रमांक - ९२४ अन्वये क्रिडा धोरण ठरविलेले आहे. व नागरी क्रिडा केंद्राची स्थापना करून विविध ठिकाणी संकुले व खेळाचे मैदान या संदर्भात वैयक्तिक, सांघिक, प्रशिक्षण व स्पर्धा शुल्क आकारण्या संदर्भात निर्णय झालेला आहे. त्यातील क्रिडा प्रकार बॅडमिंटन सर्व उपलब्ध क्रिडा केंद्रावर इयत्ता सातवी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनी करीता वैयक्तिक शुल्क प्रतिमाह रू.५०/- सांघिक शुल्क पाच खेळाडू करीता रू.२५०/- प्रतिमाह फक्त असा बदल करण्यास व इतर कोणतेही बदल न करता दुरूस्त प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री. संतोष जेजुरकर

**चर्चा :**

श्री.संजय जोशी : इयत्ता ७ वी पर्यंत रू.५०/- सांघीक शुल्क रू.२५०/- आपोआपच होते. जे २५०रू. विदयार्थ्यासाठीच आहे मोठया खेळांडूनसाठी नाही. अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : इयत्ता ७ वीच्या विदयार्थ्यांकरीताच ही सवलत आहे त्यांनाच रू. ५० ची सुट देण्यात यावी काही बदल न करता विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :कुस्ती स्पर्धेसाठी २५ लक्ष दिले जाते त्यावेळी महापालिकेचा मेनरोल असतो. याचा विचार केला पाहिजे.

श्री.त्र्यंबक तुपे : कुस्ती स्पर्धा व हा विषय एकत्र करू नये. हा विषय वेगळा आहे.

मा.महापौर :मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा दिनांक १८.०७.२००७ प्रस्ताव क्रमांक - ९२४ अन्वये क्रिडा धोरण ठरविलेले असल्यामूळे, व नागरी क्रिडा केंद्राची स्थापना करून विविध ठिकाणी संकुले व खेळाचे मैदान या संदर्भात वैयक्तिक, सांघिक, प्रशिक्षण व स्पर्धा शुल्क आकारण्या संदर्भात निर्णय झालेला असून,त्यातील क्रिडा प्रकार बॅडमिंटन सर्व उपलब्ध क्रिडा केंद्रावर इयत्ता सातवी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनी करीता वैयक्तिक शुल्क प्रतिमाह रू.५०/- सांघिक शुल्क पाच खेळाडू करीता रू.२५०/- प्रतिमाह फक्त असा बदल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.१४ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गट ‘क’ व गट ‘ड’ मधील कर्मचाऱ्यांना सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणानिमित्ताने सानुग्रह अनुदान अदा करण्यात येईल असे मा.महापौर यांनी आश्वसित केले आहे. या नुसार सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी ज्या दराने सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले, त्यानुसार सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी ३० दिवसाचा बोनस द्यावयाचा झाल्यास याप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

०१. दिनांक ०५ नोव्हेंबर १९९९ च्या शासन निर्णयानुसार परिगणना वित्त मर्यादा रू.२५००/- जी की एकतीस दिवसाकरीता असून महानगरपालिकेच्या पात्र कर्मचाऱ्यांना चालु वर्षाकरीता तीस दिवसासाठी रू.२४१९ प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करण्याचा निर्णय प्रस्तावित करण्यात येत आहे.

०२. दैनिक वेतन,ठराविक वेतन,बालवाडी शिक्षिका व सेविका हे सानुग्रह अनुदानास पात्र नसल्यामूळे त्यांना गत वर्षी दिवाळी भेट म्हणून रू.१५००/- अदा करण्यात आले होते. मात्र या वर्षी यांना रू.१५००/- मध्ये रू.२५०/- वाढ करून रू.१७५०/- दिवाळी भेट म्हणून प्रस्तावित करण्यात येत आहे.

०३. गतवर्षी प्रमाणेच यावर्षी सुध्दा दिवाळी सण अग्रीम म्हणून महानगरपालिका स्थायी कर्मचाऱ्यांना रू.१५००/- अदा करण्यात येतील व त्याची दहा समान हप्त्यात वसूली करण्यात येईल.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिकेच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

मा.महापौर : प्रशासनाचा बोनस व अग्रीम देणे संदर्भात ऐनवेळचा प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी आलेला आहे, त्यास मंजूरी देण्यांत येते.

नगर सचिव : जाणता राजा व बोनस संदर्भात दोन विषय मा.आयुक्तांनी ठेवलेले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :महापालिका रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त महापालिकेने जो जाणता राजा नाटकाचा कार्यक्रम ठैवलेला आहे त्यास येणा-या खर्चास मान्यता दयावी तसेच कर्मचा-यांना देण्यात आलेले बोनस व ॲग्रीम रक्कम बाबतच्या प्रस्तावास मान्यता दयावी.

डॉ. भागवत कराड :यास मान्यता दयावी. तिकीट नसावे विनामुल्य सर्वासाठी खुले असावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :महापालिकेच्या वतीने कार्यवाही करावी कोणत्याही संस्थेला रक्कम देवू नये.

श्री.वसंत नरवडे :जाणता राजा नाटक ऐवजी तीनदिवसात विविध दुसरे सांस्कृतीक कार्यक्रम घ्यावे.

श्री.संजय केनेकर :शहरातील नागरीकांना याचा लाभ घेता यावा विनामूल्य ठेवावे.स्थानिक कलाकाराना यात समावेश करून घेण्याची मान्यता दयावी.

डॉ. भागवत कराड : दोन्ही विषयास मान्यता देण्यात यावी.

श्री.संजय जोशी :वर्धापन दिना निर्मित्ताने भारूडांचा कार्यक्रमही घेण्यात यावा.

मा.महापौर : मा.आयुक्ताकडून आलेल्या प्रस्तावास सभा कामकाज नियमावलीचे नियम १ (के) प्रमाणे दुरूस्तीसह मान्यता देण्यांत येते. जाणता राजा हा प्रयोग व इतर कार्यक्रम वर्धापन दिना निमित्ताने करण्याच्या खर्चास मान्यता देण्यात येते. प्रशासनाने जागा निश्चित करावी तसेच कर्मचा-यांना बोनस व सहानुग्रह अनुदान च्या कार्योत्तर प्रस्तावास मान्यता देण्यात येते. जाणता राजा महानाट्यात स्थानिक कलाकारांचाही कार्यक्रमात समावेश करावा. या नाट्यप्रयोगासाठी स.नगरसेवक, मनपा अधिकारी,कर्मचारी व प्रतिष्ठित नागरीक व स.पदाधिकारी ठरवतील त्याप्रमाणे मोफत पास/प्रवेशिका देणे, दर ठरविणे, नाट्यप्रयोगांचे दिवस ठरवतील त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गट 'क' व गट 'ड' मधील कर्मचाऱ्यांना सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणानिमित्ताने प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ व ३ नुसार देण्यात आलेले सानुग्रह अनुदान,अग्रीम तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देणे बाबतच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त मा.महापौर महानगरपालिका, यांनी सुचना केल्यानुसार विविध प्रकारच्या सांस्कृतिक व इतर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. याअंतर्गत श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे लिखीत व दिगदर्शित जाणता राजा या महानाटयाचे एकुण तीन प्रयोग दिनांक १२,१३ व १४ डिसेंबर २००७ या कालावधीमध्ये आयोजित करण्याचे निश्चित केले आहे. सदरील प्रयोगासाठी महाराज शिवछत्रपती प्रतिष्ठान पूणे यांना रू.१२.०० लक्ष इतका मानधन खर्च अपेक्षित आहे सदरील प्रयोगांची संख्या वाढविण्याचे ठरविल्यास प्रतिप्रयोग रू.४.०० लक्ष याप्रमाणे वाढीव मानधन द्यावे लागेल. सदरील प्रयोगासाठी करारनाम्याच्या वेळी ॲडव्हान्स रक्कम रू.१०.०० लक्ष डी.डी. स्वरूपात देणे आवश्यक आहे. उर्वरित २.०० लक्ष प्रयोगाच्या पूर्वी देणे आवश्यक आहे. कार्यक्रमासाठी जागा निश्चित करून कार्यक्रमाच्या तारखेपुर्वी १५ दिवस जागा संबंधीत प्रतिष्ठाणच्या ताब्यात देणे आवश्यक आहे.

सदरील मानधना व्यतिरीक्त प्रयोगासाठी आवश्यक साधने, सुविधा आणणे व पोहच करणे/ वाहतुक खर्च,कलाकार व तंत्रज्ञ यांच्या राहण्याची व जाण्यायेण्याची व्यवस्था,जेवण, प्रेक्षकांसाठी गॅलरी, कपडेपट, प्राणी उपलब्ध करणे, इ.करीता एकुण रक्कम रू.१५.०० लक्ष खर्च आवश्यक आहे.

सदरील कार्यक्रमासाठी करण्यात येणारा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षाअंतर्गत वर्धापन दिनानिमित्त ठेवण्यात आलेल्या तरतुदीनुसार करण्यात येईल.

त्यानुसार खर्च रक्कम रू.२७.०० लक्ष व सदरील प्रयोग वरील तारखेस तसेच जागा निश्चिती करणे, तिकीट दर निश्चित करणे व इतर घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमास करण्यात येणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिका रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त जाणता राजा या महानाट्याचे स.पदाधिकारी ठरवतील त्याप्रमाणे नाट्यप्रयोग करणे,त्यांनी ठरविल्याप्रमाणे प्रवेशिकेचे दर ठरवणे,स.पालिका सदस्य, महापालिका अधिकारी,कर्मचारी,शहरातील प्रतिष्ठित नागरीक इत्यादींना मोफत प्रवेशिका देणे यासह या नाट्यप्रयोगासाठी येणाऱ्या संपूर्ण खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.वसंत नरवडे : रस्त्याचे कामाचे ई टेंडरींग निघालेले होते टेंडर भरण्याच्या शेवटच्या दिवशी वेब साईड दोन तास का बंद होती. कोणी कार्यक्रम केला. याची तज्ञाकडून चौकशी करावी. गोलमोल उत्तर देवून दिशाभूल केली. सर्वसामान्याची दिशाभूल केली. तज्ञाकडून अहवाल घ्यावा,तोपर्यंत टेंडर करू नये.

श्री.संजय जोशी : मा.आयुक्तांनी निर्णय घ्यावा.

श्री.भगवान घडमोडे :जर संबधीत ठैकेदाराला दोन तास निविदा भरण्या पासून वंचित ठेवले काय गौडबांगल आहे. प्रत्येकवेळी असे केले का. रिंग सुरू झाली का.

श्री.देसरडा प्रशांत :दररोज २० ते २५ टेंडर सादर होतात.त्यासाठी ५ लक्षच्या वरील काम ईटेडरींगमध्ये घ्यावे. एक-एक ठेकेदार २०-२० सबमीट करतात, वेबसाईट ब्लॉक होते.

श्री.केनेकर संजय :शहरात बेरोजगाराची संख्या जास्त आहे यापूर्वी ज्याची जास्त पैशाची कुवत नसतांना लहान लहान चांगले काम करून देत असे. त्यांना आता काम मिळत नाही त्यामुळे मोठे ठेकेदार ईटेंडरींग मध्ये येवून बेरोजगाराची संख्या वाढवित आहे.याकडे लक्ष देण्याची गरज आहे. बेरोजगारांना काम मिळाले पाहिजे.

श्री.वसंत नरवडे :नागरीकाच्या कराच्या अपेक्षेने मोठमोठे कर्ज काढून रस्त्याची कामे करीत आहोत ईटेंडरींग मध्ये काही घोळ होवू नये याची दखल घ्यावी. २ तास वेबसाईट बंद होती, तज्ञाकडून यांची चौकशी व्हावी तोपर्यत कुठलेही काम करू नये.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : कोणतीही वेबसाईट ब्लॉक होत नाही. मानव निर्मित आहे. त्यामूळे ब्लॉक झाली असेल. ई टेंडरींग असावे या मताचा मी आहे ती ब्लॉंक का झाली याची चौकशी व्हावी जो खर्च झालेला आहे त्याचीही चौकशी व्हावी.जे लहान लहान ठेकेदार आहेत ते बेरोजगार होणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.महेश मांळवतकर :कामे लवकर व्हावी म्हणून ईटेंडारींग सुरू केले. माझे वार्डातील ड्रेनेज देखभाल दुरूस्तीचे काम तीन महिण्यापूर्वी ईटेंडरींगला आले अडीच महिने संबधीत विभागाला कळविले नाही.ही चुक कुणाची माहिती दयावी.सिडको भागात उर्जा बचत दिवे लावण्यात आले सदर ठेकेदार ते दुरूस्त करण्यास तयार नाही.कार्य.अभियंता यांना कळविले तरी कार्यवाही झाली नाही.नुसतेच दिवे लावणार,दुरूस्त करण्याचे कायनियोजन केले आहे याची माहिती दयावी

कार्य.अभियंता (विदयु.) :दोन दिवसात काम करून घेतले जाईल.

सौ.रजनी जोशी : नागरीकासाठी वार्डातील विकास कामे लवकर होतील म्हणून ईटेंडरींग सुरू केले लहान लहान रक्कमेची कामे होत नसतील तर याला अर्थ नाही. एक लक्ष पर्यतचे विकास कामे करण्याच्या खर्चास वार्ड अधिकारी व वॉर्ड कमेटीला अधिकार दयावे लाईटचे देखभाल दुरूस्तीचे काम करण्याचे आदेशीत करावे.

श्री. दत्ताभाउ पाथ्रीकर:सिडकोकडे असतांना सिडकोभागात अतिक्रमण होत नव्हते परंतू आता मोठया प्रमाणात सिडकोत अतिक्रमण होत आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.कैलास गायकवाड :ज्या सभागृहात आपण सर्व बसलेलो आहोत असे ते प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांची पुण्यतिथी आहे.सभागृहातर्फे त्यांना अभिवादन करण्यात यावे.

श्री.देसरडा प्रशांत :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे याची आज पुण्यतिथी आहे. सभागृहाच्या वतीने अभिवादनाचा ठराव मंजूर करण्यात येत आहे.

श्री.शंशाक विसपुते :काही कामाचे टेंडर होवून तीन तीन महिने झाले कामे सुरू होत नाही.

प्र.कार्य. अभि. :कार्य अभियंता पाणीपुरवठा हे आज रजेवर असल्याने माझ्याकडे त्यांचा चार्ज असून आज या संबधी माहिती देवू शकत नाही.

श्री.संतोष खेंडके :गुंठेवारीच्या ज्या ज्या भागातून पैसे जमा झाले त्या त्या भागात विकास कामे करण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :गुंठेवारीतील जमा झालेली रक्कम इतर ठिकाणी वापरण्यात येवू नये ती गुंठेवारी भागातच वापरण्यात यावी.

मा. महापौर :आताच स् सदस्यांनी ईटेंडरींग बाबत मुद्या मांडला वेब साईड दोन तास का बंद होती याची तज्ञाकडून चौकशी करून घ्यावी.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :सन २००३ पासून माझ्या वार्डात पिण्याच्या पाण्याची मागणी करीत आहे. आदिनाथनगर भागात मोठया प्रमाणात पाणी वाया जाते माझ्या वार्डात अनेक सोसायटीज १०० टक्के विकास कर भरणा करतात अशा वस्तीमध्ये हे पाणी देण्यात यावे. लिगल एरियाला पाणी मिळेल.

श्री.कचरू मोरे :पाणी पुरवठयाची कामे करतांना अनेक पाईपमध्ये वस्तु अटकते पाणी पुरवठा बंद होतो.यामूळे पिण्याच्या पाण्यात व्यत्यय येतो.ठेकेदार वेळीच काम करीत नाही त्यामूळे गरीब लोक पाण्यापासून वंचीत राहतात.जेथे पाणी वाया जाते तेथे तोटया बसवण्याची मागणी केली होतीत्याकडे लक्ष दिले जात नाही

श्री.शंशाक विसपुते : नगरसेवक जेंव्हा वार्डात पिण्याच्या पाण्याची मागणी करतात पाणी दिले जात नाही परंतू नाथप्रांगण,आर.बी.एस.ई. ठिकाणी पाणी पुरवठ्याची मागणी करतो. पाणी देता येत नाही म्हणतात,बिल्डरांना बांधकाम सुरू झाल्यापासून पाणी दिले जाते.

मा.महापौर :ज्या गुंठेवारी भागातून निधी जमा झाला त्याच भागात विकास कामे करण्यात यावी. श्री.डी.पी.कुलकर्णी का उपस्थित नाही मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

प्र.मा.आयुक्त :श्री.डी.पी.कुलकर्णी हे १७ तारखेपासून आजारी रजेवर असल्याने त्यांनी चार आठवडयाची रजा दिलेली आहे. त्याचा कार्यभार कार्य.अभियंता विदयुत श्री.पानझडे यांचेकडे आहे.

मा. महापौर :पाणी पुरवठयाच्या संबधी स.सदस्यांनी जी मागणी केलेली आहे त्ती ती कामे करण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**,
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## सर्वसाधारण सभा

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०२)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- १२.११.२००७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१ (क) अन्वये **मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांनी मंगळवार दिनांक २०.११.२००७ रोजी सकाळी ११.३० वाजता** औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजित सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

**<u>वृत्तांत कायम करणे</u>**

**विषय क्र.०३/०१ :**

दिनांक २०.०९.२००७ व दि.२९.०९.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

**(प्रश्नांची यादी सोबत जोडण्यांत आलेली आहे. )**

**<u>प्रशासकीय प्रस्ताव</u>**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०२)

दिनांक २०.११.२००७ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेत विचारण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.९६ अन्वये

## प्रश्नांची यादी.

**श्री.प्रशांत देसरडा,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.१ :**

महानगरपालिकेतर्फे शहरात मागील ०२ वर्षात किती हायमास्ट बसविण्यात आले? व कोणत्या ठिकाणी?कोणत्या लेखाशिर्षकाखाली?

**प्रश्न क्र.२ :**

हायमास्ट बसविण्याकरीता किती जागा (क्षेत्रफळ) आवश्यक आहे? त्या ठिकाणी हायमास्ट बसविण्यात आले त्या प्रत्येक ठिकाणी किती स्क्वेअरफुट अंतरापर्यंत प्रकाश पडतो?

**प्रश्न क्र.३ :**

ज्या ठिकाणी हायमास्ट बसविण्यात आले त्याच्या आजुबाजुचे क्षेत्रफळ किती? हायमास्ट बसविण्यापूर्वी निविदा काढण्यात आल्या होत्या का?

**प्रश्न क्र.४ :**

महाराष्ट्र शासनाचे वाढीव विज वापरा संबंधी काही परिपत्रक/आदेश आहेत काय? असल्यास या बाबत मनपाची भुमिका काय?

उपरोक्त सर्व माहिती सविस्तर कळविण्यात यावी.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०.११.२००७ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील**
**प्रश्नोत्तरे**

**श्री.प्रशांत सुभाष देसरडा,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.१ :**

महानगरपालिकेतर्फे शहरात मागील ०२ वर्षात किती हायमास्ट बसविण्यात आले? व कोणत्या ठिकाणी?कोणत्या लेखाशिर्षकाखाली?

**प्रश्न क्र.२ :**

हायमास्ट बसविण्याकरीता किती जागा (क्षेत्रफळ) आवश्यक आहे? त्या ठिकाणी हायमास्ट बसविण्यात आले त्या प्रत्येक ठिकाणी किती स्क्वेअरफुट अंतरापर्यंत प्रकाश पडतो?

**प्रश्न क्र.३ :**

ज्या ठिकाणी हायमास्ट बसविण्यात आले त्याच्या आजुबाजुचे क्षेत्रफळ किती? हायमास्ट बसविण्यापूर्वी निविदा काढण्यात आल्या होत्या का?

**प्रश्न क्र.४ :**

महाराष्ट्र शासनाचे वाढीव विज वापरा संबंधी काही परिपत्रक/आदेश आहेत काय? असल्यास या बाबत मनपाची भुमिका काय?

उपरोक्त सर्व माहिती सविस्तर कळविण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता, (जलनिःसारण, विद्युत,इमारती व उद्याने)**

**उत्तर :**

सोबत जोडण्यांत आले आहे.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सर्वसाधारण सभा**
**पुरवणी विषय पत्रिका**

**दिनांक :- १६.११.२००७**

(मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि 'ड' चे प्रकरण -२ आणि नियम -१ (ज) अन्वये)

मंगळवार दिनांक २०.११.२००७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पुरवणी विषय पत्रिका पाठवित आहोत.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा
## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०२)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- १७ .११.२००७**

मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांनी मंगळवार दिनांक २०.११.२००७रोजी सकाळी११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजीत सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

**विषय क्र.०१ :**

दिनांक २०.०९.२००७ व दि.२९.०९.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**विषय क्र.०२ :**

प्रभाग क्र.७२ अंतर्गत मुख्य रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे र.रू.४०,९९,८००/-अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र.०३ :**

औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरणा करीता लागणाऱ्या क्लोरीनच्या पुरवठयासाठीच्या र.रू.२७,०४,०००/-अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र.०४ :**

वार्ड क्र.४४, सेंट्रल नाका कब्रस्तान ते रहेमानिया कॉलनी पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणेच्या कामाचे र.रू.२४,०००००/- चे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र.०५ :**

प्रभाग क्र.८२ करीता सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.२२८ वर असलेली तरतूद इतर कामासाठी वळती करणे.

सुचक : सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे

अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल, श्री.राजेश (पप्पू) व्यास, श्री.भागवत कराड, श्री.त्र्यंबक तुपे

**पुरवणी विषय**

**विषय क्र.१ :**

प्रभाग इ अंतर्गत विविध विकास कामे करणे करीता अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु १४५ अ.क्र.२ वरील तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्षक बदलणे.

सुचक : श्री. दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**विषय क्र.२ :**

वार्ड क्र.११ मधील व्हीआयपी रोडवरील पुतळा वाहतुक बेटाची देखभाल व दुरूस्तीच्या निधीतून प्रशासकीय इमारतीची रंगरंगोटी,विद्युतीकरण, ॲल्युमिनीयम डोअर ई.दुरूस्तीच्या कामासाठी २.०० लक्षची तरतुद करणे

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना अनुमोदक : श्रीमती शमशाद बेगम

**विषय क्र.३ :**

भिमनगर भावसिंगपुरा येथील पुल ते महानगरपालिका शाळा या मार्गास शहीद विलास शिंदे मार्ग असे नाव देणे.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे अनुमोदक : श्री.सलिम खान यासीन खान

**विषय क्र.४ :**

अर्थसंकल्पातील प्रभाग क्र.३१ गटार बांधणे व १०० मि.मि. व्यासाची डी.आय.के-९ जलवाहिनी टाकणे या ऐवजी प्रभाग क्र.३१ मध्ये ड्रेनेज लाईन दुरूस्ती, गटार दुरूस्ती,फर्शी बसविणे कॉंक्रेटींग करणे, खडी रस्ते, माती उचलणे खडी मुरूम टाकणे इ. फुटकळ कामे करणे बाबत.

सुचक :श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

**<u>विषय क्र.५ :</u>**

वार्ड अ अंतर्गत पान क्र.६३ अ.क्र.६ रू.१ लाखाचे काम रद्द करून लोटा कारंजा भागात पाणीपुरवठा जलवाहिनीची लांबी वाढवून घेणे बाबत.

सुचक :श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

**<u>विषय क्र.६ :</u>**

क्रिडा धोरण बॅडमिंटन खेळासाठी इयत्ता ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सांघिक शुल्क रक्कम कमी करणे संबंधी.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री. संतोष जेजुरकर

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद